**।। ॐ श्री साईराम ।।**

## ‘साई पर्ल्स ऑफ व्हिजडम’

## साई ज्ञानमौक्तिके

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १३-ब

### ‘त्यागवृत्तीची गरज’

आणि मग भगवानांनी त्यागवृत्तीची गरज असण्याबद्दल त्यांची मते स्पष्टपणे मांडायला सुरुवात केली. त्याग करणं हे फारच महत्त्वाचे आहे.

भगवान म्हणाले, ‘‘तुम्ही तुमच्या नावलौकिकासाठी आणि प्रसिद्धीसाठी जे जे करता, तो त्याग नसतो. नाही!’’

पुढे ते म्हणाले,‘‘तुम्ही जर दुसऱ्यांना देत जाल तर तुम्हाला देवाकडून अधिकाधिक मिळत राहील. द्यायला शिका, ज्यामुळे देव तुम्हाला देत राहील. जर तुम्ही दिलेच नाही, साठवतच राहिलात, लपवून ठेवाल तर तुमच्या स्वत:साठीच ठेवलंत, तर काहीही वृद्धी होणार नाही. काहीच वाढणार नाही. जर तुम्ही वाटून द्यायला आणि सहभागी होण्यास सुरूवात केलीत तर प्रत्येक गोष्टीची वृद्धी होईल.’’

स्वामी पुढे बोलू लागले, ‘‘माणूस म्हणून जन्माला आल्यावर तुमच्या आयुष्याला असं वळण लावा की एक चांगला माणूस म्हणून म्हणवून घ्याल. चांगलं होण्यासाठी जगा. समाजात चांगलं नाव होण्यासाठी जगा.’’

पण आज आपलं जीवन कसं झालं आहे? बरेचसे लोक तुमच्यासमोर म्हणतात की तुम्ही चांगले आहात आणि तुमच्या पाठीमागे त्यांच्या मनात तशी भावना नसते. म्हणून लोकांनी तुम्हाला तुमच्यासमोर आणि तुमच्या पाठीमागेही तुम्हाला चांगलंच म्हटलं पाहिजे. म्हणजे तुम्ही सर्व बाजूंनी, सर्व बाबतीत निर्दोषच, बिनचूक असायला हवं.

### ‘‘जीवन हे इतकं कृत्रिम आहे का?’’

‘‘स्वामी, जीवन हे इतकं कृत्रिम आहे का?’’ मी विचारलं.

स्वामी म्हणाले, ‘‘होय.’’

‘‘अच्छा! तर मी कृत्रिम जगण्यात यशस्वी होईन का?’’

स्वामी म्हणाले, ‘‘नाही. तुझा कृत्रिम स्वभाव तसाच राहणार नाही. आज किंवा उद्या तुझी नैसर्गिक वृत्ती व्यक्त होईलच.’’

‘‘कोणताही माणूस दु:खी किंवा वाईट परिस्थितीत खऱ्या स्वरूपात व्यक्त होतो. जेव्हा त्याची परीक्षेची वेळ येईल किंवा जीवन पणाला लागेल, तेव्हा त्याच्याकडून सत्य बाहेर येईल.’’

आणि हा मुद्दा स्पष्ट करण्याकरता स्वामींनी एक छोटीशी गोष्ट वर्णन करून सांगितली. एक अभ्यासू माणूस भगवान नारायण आणि भगवान शिवशंकर याच्यावर अतिशय अप्रतिम भाष्य करू शके. त्याची भाषणे ऐकल्यावर, तो नारायणाचा भक्त होता की शिवाचा, हे तुम्ही सांगू शकला नसता. जर तो ख्रिस्त आणि राम या दोघांवरही अतिशय सुंदर बोलला, तर तो ख्रिश्चन आहे का हिंदू आहे हे तुम्ही कसं सांगू शकला असता? अशक्य आहे! तसंच हा अभ्यासू माणूस नारायण आणि शिव ह्यांच्याबद्दल खूपच चांगल्या पद्धतीने बोलत होता. तो कुणाचा भक्त होता याचा लोकांना अंदाज करता येत नव्हता.

पण तिथे एक खूप हुशार बाई होती. तिने एक लोखंडाची सळई आणली, आगीत ठेऊन तापवली आणि त्याच्या पाठीवर त्या गरम सळईनं चटका दिला. तो ओरडला, ‘‘नारायणा, नारायणा, नारायणा!’’ (हशा) अशा रीतीने सर्वांना तो नारायणाचा भक्त आहे, हे समजले. बघा, जेव्हा जीव संकटात असतो किंवा तुम्ही अडचणीत असता, तेव्हा सत्य अशा तऱ्हेने बाहेर येते असे भगवान म्हणाले.

## ‘‘मुलं कशी आहेत?’’

नंतर बाबांनी मुलांविषयी चौकशी करायला सुरुवात केली. त्यांनी वॉर्डनला त्यांच्याजवळ बोलावले आणि विचारले, ‘‘वॉर्डन, मुलं कशी आहेत?’’

‘‘स्वामी, ती छान आहेत.’’

‘‘जेवणाचं कसं काय चाललंय?’’

‘‘खूप छान, स्वामी.’’

‘‘हं. छान. मुलं कशी आहेत? जेवणाचे पदार्थ कसे आहेत?’’

वॉर्डन म्हणाला, ‘‘ते व्यवस्थित खातात. बागा, टिंटूनारू, टिंटूनारू. ते छान खात आहेत.’’

स्वामी म्हणाले, ‘‘टिंटम् काडू- खाण्याबद्दल नाही, पण उंटम् म्हणजे त्याचं जीवन महत्त्वाचं आहे. बागा उंटुनारू- ते चांगले आहेत. मला असं सांग की ते खूप छान आहेत- ते खूप छान खात आहेत ह्यापेक्षा ते चांगल्या स्थितीत आहेत हे मला हवं आहे. मला तुझ्याकडून ती मुलं इथे चांगल्या परिस्थितीत आहेत याची माहिती हवी आहे.’’

पाहा, इथे दोन शब्द आहेत. टिंटम् म्हणजे खाणं आणि उन्टम् म्हणजे राहणं. म्हणजे ती इथे चांगल्या प्रकारे राहात आहेत, फक्त चांगलं खातात असे नको. असं ते म्हणाले तेव्हा हास्याची कारंजी उडाली.

## ‘‘त्यांना माहीत नसणारी एकही भाषा नाही.’’

आणि स्वामींनी एकदम इटालियन भाषेत बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले, ‘‘अमोर’’ किंवा असंच काहीतरी.

ठीक. स्वामी म्हणाले, ‘‘इटालियन, इटालियन!’’

ओह! मी त्यांच्याकडे पाहिले आणि ते म्हणाले, ‘‘अमोर म्हणजे काय हे तुला माहीत आहे?’’

‘‘मला माहीत नाही. स्वामी.’’

‘‘याचा अर्थ म्हणजे तुला ते आवडते आहे.’’

‘‘ओह! लक्षात आलं, स्वामी.’’

तेव्हा माझ्या लक्षात आलं की त्यांना माहीत नाही अशी कुठलीही भाषा नाही. त्यांना सगळ्या भाषा माहीत आहेत. आम्ही सर्व खूपच आश्चर्यचकित झालो.

नंतर मग ज्यांना तेलगु भाषा येत नाही त्यांची गंमत करायला त्यांनी सुरुवात केली. त्यांनी बिहारच्या मुलाला बोलावले.

‘‘ए मुला, तुला ‘कांथी’ म्हणजे काय हे माहीत आहे?’’

‘कांथी’ हा तेलगु शब्द आहे आणि त्या मुलाला तेलगु भाषा येत नव्हती.

कोणीतरी ओरडले, ‘‘हेऽऽ!’’

स्वामी म्हणाले, ‘‘सांग, सांग.’’

त्या मुलाने कसंतरी सांगितलं, ‘‘स्वामी, कांथी म्हणजे ‘प्रकाश.’

‘‘बरोबर उत्तर, ओ हो ओ हो’’

नंतर स्वामी म्हणाले, ‘‘तुला कांथा म्हणजे काय माहीत आहे? कांथा कोण आहे?’’

त्याला ते माहीत नव्हतं. (हशा) तो म्हणाला, ‘‘स्वामी, कांथा म्हणजे जो प्रकाश देतो तो.’’

सगळे जण हसायला लागले. ‘कांथा’ म्हणजे ‘स्त्री’ (हशा) सगळे हसले. अशा तऱ्हेने स्वामी विनोद करून मनोरंजन करीत आणि सर्वांना हसवीत.

## ‘मी तुम्हाला अमर्याद प्रेम देण्यास तयार आहे.’

नंतर वॉर्डन म्हणाले, ‘‘स्वामी, तुमचे प्रेम अमर्याद आहे. ते प्रेम महासागरासारखं खोल आहे. ते खूपच व्यापक आहे.’’

बाबांनी ह्याला उत्तर काय दिलं तुम्हाला माहीत आहे?

‘‘हो! मी ते अमर्याद प्रेम तुम्हाला देण्यास तयार आहे. पण तुमच्यापैकी कोणीही ते घेऊ शकत नाही. तुमच्यापैकी कोणीही माझ्या हातून ते प्रेम घेऊ शकत नाही. मी काय करू? मी द्यायला तयार आहे.’’

## ‘आम्ही मुक्त का नाही?’’

‘‘स्वामी, एक प्रश्न. कृपा करा.’’

‘‘ओह! ठीक, ठीक! काय प्रश्न आहे?’’

‘‘स्वामी, आज जर परमेश्वर अवतार स्वरूपात आमच्याबरोबर आहे, मानवी स्वरूपात आहे, तर आम्ही त्याला ओळखण्यास, मुक्तीसाठी प्रयत्न करण्यात असमर्थ का आहोत? का? आम्ही प्रत्यक्ष अवताराच्या समवेत, समकालीन आहोत, तरी आम्हाला मुक्तावस्था नाही? असं का? प्रत्येकाला मुक्ती मिळत नाही. का?’’

बाबांनी उत्तर दिले, ‘‘खूप लोक धावण्याच्या शर्यतीत भाग घेतात पण एकच व्यक्ती ह्या शर्यतीत पहिली येते. तुम्ही परमेश्वराच्या समकालीन, समरूप असाल, पण तरी मुक्ती एकालाच मिळते. भगवद्गीतेत हे असंच सांगितलं आहे.’’

स्वामींनी धावण्याच्या यर्शतीचं उदाहरण दिलं, ‘‘भगवत्गीतेत हे फार पूर्वीच सांगितलं आहे. लक्षावधी किंवा कोट्यावधी लोकांमध्ये फारच थोड्या लोकांना परमेश्वराची ओढ असते. त्यांच्यातील फारच थोड्या माणसांना मुक्तीची ओढ असते. अशा या थोड्या लोकांमधील अगदी हातावर मोजण्याइतक्या लोकांनाच मुक्ती मिळते.’’

तसेच, आपण अवतारकालात त्याच्या समवेत असल्याने आनंदी असतो, पण आपल्याला हेही समजलं पाहिजे की मुक्ती मिळविण्यासाठी आपण त्या योग्यतेचे आहोत का? मी तुम्हाला शिर्डीसाईंनी दिलेले उदाहरण सांगतो. त्यांनी असं म्हटलंय, ‘‘आंब्याच्या झाडाला खूप फुले येतात, प्रत्येक फुलाचे रुपांतर फळात होत नसते. कितीतरी फुले झाडावरून गळून जमिनीवर पडतात. त्यामुळे फक्त थोडीच फुले फळाचे रूप धारण करतात. अगदी तसंच, खूप लोक इथे येतात, पण थोड्यांनाच मुक्ती मिळते.’’

## ‘जून २००१’

आता मे २००१ मध्ये जे झालं ते सांगून झाल्यावर मी आता जून २००१ कडे वळतो.

## ‘‘मन आणि हृदय यामधील फरक काय?’’

प्रश्न असा आहे: ‘‘स्वामी, मन आणि हृदय यात काय फरक आहे?’’

तेव्हा स्वामी म्हणाले, ‘‘ते शरीरातील हृदय नसून ते आध्यात्मिक हृदय आहे, जे फार महत्त्वाचे आहे. अध्यात्मिक हृदय आणि मन यात असा फरक असतो की मन हे हेलकावणारे असते; तर अध्यात्मिक हृदय हे स्थिर असते. शारीरिक हृदय हे डाव्या बाजूला असते, तर अध्यात्मिक हृदय हे शरीराला संपूर्ण व्यापून राहिलेले असते.’’

आणि भगवान म्हणाले, ‘‘अध्यात्मिक हृदय हे स्थिर असते तर मानवी मन हे तरंगणारे असते. ते हलते.’’

मग मी म्हटलं, ‘‘स्वामी, तुम्ही सांगितलेले अध्यात्मिक हृदय स्थिर असते, ते उजव्या बाजूस असते आणि शारीरिक हृदय डाव्या बाजूला असते, ह्या सगळ्या गोष्टी माझ्या लक्षात आल्या नाहीत. मला समजल्या नाहीत, कृपा करा.’’

तेव्हा स्वामी म्हणाले, ‘‘सत्य, प्रेम, त्याग, सहनशीलता, धीर धरणे ह्यासारखे गुण हे तुमच्या हृदयात निर्माण होतात.’’

‘‘बुद्धी, तत्त्वज्ञान, निरनिराळी शास्त्रे, मानवता ह्या सर्व गोष्टी जागतिक ज्ञानाच्या गोष्टी आहेत. त्यांचा समावेश मनात असतो.’’

‘‘स्वामी, हे ठीक आहे, पण मी मनापासून प्रार्थना करतो की मी काय करावे? मला वाटतं की तुम्हा सर्वांना माझे विचार समजले आहेत, बरोबर? भगवानांनी सांगितले, ‘‘हृदय हे महत्त्वाचे आहे. पण आपण मनापासून प्रार्थना करतो. तर आपण काय केले पाहिजे?’’

भगवानांनी असे उत्तर दिलं. सर्व साईभक्तांसाठी किंवा सर्व धर्माच्या भक्तांसाठी ही गोष्ट महत्त्वाची आहे याची नोंद ठेवा.

‘‘तुम्ही मनापासून जे काही करता, त्यामुळे तुम्हाला तात्पुरते समाधान मिळते. मनापासून केलेल्या प्रयत्नांचा परिणाम हा समाधानकारक असतो. पण जर तुम्ही हृदयापासून प्रार्थना केलीत तर तुम्ही यशस्वी व्हाल. मनापासून मिळालेला तात्पुरता आनंद व समाधान, ह्यापेक्षा हृदयाकडून मिळालेला आनंद शाश्वत स्वरूपात राहील.’’ असं स्वामी म्हणाले. पण माझे मन शंकाविरहित झाले नाही. भगवानांनी सांगितलेल्या गोष्टी पचवायला माझं मन असमर्थ होतं.

## ‘चांगलं मन आणि वाईट मन ह्यात काय फरक?’

नंतर मी म्हटलं, ‘‘स्वामी, कृपया दुसरा एक प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी. आपण वारंवार म्हणतो, ‘‘तो मनाने चांगला आहे आणि ह्याचे मन चांगले नाही.’’ मग चांगले मन आणि वाईट मन ह्यातील फरक काय?’’

भगवानांनी एक सुंदर उदाहरण दिलं. ‘‘मन हे पाण्यासारखं संथ असतं. पाण्याच्या वरच्या पातळीवर तुम्हाला लाटा किंवा तरंग दिसतात. त्या तुमच्या भावनाच असतात. तुमचं मन चांगलं आहे की वाईट आहे हे त्या भावनाच ठरवतात. जर भावना वाईट असतील तर मन वाईट असेल, चांगल्या भावना असतील तर मन चांगलं असतं.’’

## ‘गाढ निद्रेत मन कुठे असतं?’

मला असं वाटलं की मी जरा जास्त हुशार आहे. (हशा) मला वाटलं, की मला थोडसं तत्त्वज्ञानही माहीत

आहे. आणि ते मला दाखवायचं होतं.

''स्वामी, मला एक शंका आहे.''

''असं? कोणती शंका?''

''स्वामी, गाढ झोपेत असताना मन कुठे असतं?''

बाबा म्हणाले, ''मन हे शांततेत असतं. मन हे स्थिरतेत असतं, मन समतोलपणात असतं. गाढ झोपेत मन हे निष्क्रिय, शांत आणि तटस्थ अवस्थेत असतं. ह्याचा अर्थ असा नाही की मन हे अनुपस्थित असतं किंवा दूर पळून गेलेलं असतं. नाही. तर ते तटस्थ, शांत आणि अविचल स्थितीत असतं.''

यापूर्वी मी अशा तऱ्हेचा अर्थ लावलेला ऐकला नव्हता. फार छान!

## 'तुमच्या मनामागे धावू नका'

''स्वामी, ठीक आहे. मला आता हे समजलं. मन हे कृत्रिम असो वा नैसर्गिक, चांगलं किंवा वाईट असो किंवा गाढ झोपेत निष्क्रिय असो अथवा जागृतावस्थेत कृतीशील असो– काहीही असलं तरी मला ते मन माकड बनवून टाकते. मला एक प्रश्न आहे, माझं ते मन इकडे तिकडे धावत असते, हेलकावत असते. त्याला मी काय करू?''

बाबा म्हणाले, ''तुझं मन धावत असू दे, पण त्या मनामागे तू मात्र धावत जाऊ नकोस (हशा)''

''ओह! असं का? पण ते कसं? कसं?''

बाबा म्हणाले, ''एखादं लहान मूल खेळत असतं पण शेवटी ते आपल्या आईकडे परत येतं. तसंच मनही लहान मुलासारखंच असतं. त्या मनाला – मुलाला – इकडेतिकडे जावून खेळू द्या. ते परत तुझ्याकडेच येईल. पण जर त्या मनाबरोबर तुम्ही पळत सुटलात तर सर्व काही गमवाल.''

अशा तऱ्हेचं सुंदर उदाहरण बाबांनी दिलं.

## 'मन हे स्वतंत्र नाही'

बाबांनी पुढे सांगायला सुरुवात केली. 'मन हे स्वतंत्र नाही.'

''ओह, असं का? मला हे माहीत नव्हतं. मला वाटत होतं की माझ्यावर माझ्या मनाचा ताबा आहे.''

स्वामी म्हणाले, ''मन हे स्वतंत्र नाही. तुम्ही तुमच्या मनाचे स्वामी आहात. मन हे तुमचे स्वामी नाही. मन हे फक्त साधन असून तुम्ही त्याचे मालक आहात. त्या मनावर कसा ताबा ठेवायचा हे तुमच्यावरच अवलंबून आहे.''

आणि भगवान म्हणाले, ''तेच मन तुम्हाला स्वातंत्र्य मिळवून देईल किंवा तेच मन तुम्हाला गुलामगिरीत नेईल.''

''स्वामी, तेच मन मला इकडे तिकडे नेत असते.''

''होय!''

''असं कसं?''

बाबा म्हणाले, ''जर तुम्ही किल्ली डावीकडे फिरवलीत तर कुलुप बंद होतं, जर ती किल्ली उजवीकडे फिरवलीत तर ते कुलुप उघडतं. एकाच किल्लीने तुम्हाला निरनिराळे परिणाम मिळतात. ती किल्ली तुम्ही कशी फिरवता यावर ते अवलंबून असतं. तसंच, जर तुम्ही तुमचं मन जगाकडे वळवाल, तर ते बंधनात जाईल, बंद होईल. जर किल्ली परमेश्वराकडे फिरवाल– जर मन हे परमेश्वराकडे वळवाल – तर कुलुप उघडेल. हीच मुक्ती

आहे. ही एकच किल्ली आहे. ती कशी फिरवता एवढाच फरक आहे. म्हणजे ते जगाकडे फिरवा किंवा परमेश्वराकडे फिरवा, मन तेच आहे.

''स्वामी, किती आश्चर्यकारक उदाहरण दिलंत! आता मला समजलं, तुम्ही मला सांगता की मी मनामागून जाऊ नये तर मन माझ्यामागे येऊ दे. मग मी कोण आहे?''

मग बाबा म्हणाले, ''मनावर बुद्धीचा ताबा असतो. ही बुद्धी शरीरातील निर्णय घेणारी शक्ती असते. ती बुद्धी परीक्षा घेते आणि त्याप्रमाणे निर्णय घेते. म्हणजेच बुद्धीलाच तारतम्य पाहून निर्णय घेण्याची शक्ती आहे. तर आता तू काय करशील? त्या बुद्धीला काय ते ठरवू द्या.. बुद्धीने जो निर्णय घेतला जाईल तसाच मन विचार करेल आणि मनाचा जो विचार होईल त्याप्रमाणे जाणीवा काम करतील.''

स्पष्ट समजलं का? वडील जे सांगतील त्याप्रमाणे आईने समजले पाहिजे, जे आई सांगेल त्याप्रमाणे मुलांनी केले पाहिजे. वडील हे बुद्धी आहे, आई हे मन आहे आणि मुलं म्हणजे जाणीवा आहेत. मी आदर्श कुटुंबाबद्दल बोलतो आहे! (हशा.) मी सध्याच्या आधुनिक कुटुंबाबद्दल बोलत नाही. मला माफ करा, कारण आई ही वडिलांना 'आभारी आहे' असं म्हणेल पण वडील असं आईला कधीही म्हणणार नाहीत आणि मुलं तिथे नसतीलच, कारण ती त्यांच्या बाहेरच्या उद्योगात गुंग असतील. पण मी परंपरावादी, चांगल्या कुटुंबाविषयी बोलत आहे; जिथे मुले आईचे ऐकतात आणि आई वडिलांचे ऐकते- एक आदर्श कुटुंब!

तर, बुद्धी ही तारतम्य पाहून निर्णय घेईल, मन हे बुद्धीकडून आज्ञा घेईल. त्यावर मग मन विचार करेल आणि जाणीवांना कारवाई, कृती करायला सांगेल. असं भगवान म्हणाले.